बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

आज़ादी का अमृत महोत्सव

**निगमित संप्रेषण और निवेशक संबंध**
प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेली -020:25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार

# वृत्तपत्रीय निवेदन

**पुणे**, **६ जून २०२२** : जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ महाराष्ट्रच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षा निमित्त अर्थ व कंपनी व्यवहार मंत्रालयाच्या सहकार्याने आयकॉनिक सप्ताह उत्सव पुणे येथे साजरा करण्यात आला.
अर्थ व कंपनी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार दिनांक ६ ते ११ जून २०२२ आयकॉनिक सप्ताह उत्सव साजरा करत असून सदर सप्ताहातील पहिला कार्यक्रम आज जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ महाराष्ट्रच्या वतीने सिद्धी लॉन्स एरवंडणा येथे सर्व बँका व विविध योजनांचे लाभार्थी यांचे उपस्थितीत ऑनलाईन व ऑफलाइन एकत्रित साजरा करण्यात आला. कार्यक्रमास मा.श्री. संजीव वर्मा, डेप्युटी कमिशनर इन्कम टॅक्स, राज्यस्तरीय बँकेचे प्रमुख व सरव्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र मा.श्री.विजय कांबळे साहेब, बँक ऑफ महाराष्ट्र चे पुणे शहर क्षेत्रीय व्यवस्थापक व सरव्यवस्थापक मा.श्री राजेश सिंह, राज्यस्तरीय बँकेचे उप सरव्यवस्थापक श्री राजेश देशमुख साहेब तसेच जिल्हा अग्रणी बँक मुख्य व्यवस्थापक श्री.श्रीकांत कारेगांवकर आदि मान्यवर उपस्थित होते .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरव्यवस्थापक व पुणे शहर क्षेत्रीय व्यवस्थापक ऑफ महाराष्ट्र मा.श्री राजेश सिंह यांनी केले. कार्यक्रमाचा हेतु विषाद करतानाच विविध सामाजिक योजना आणि बँकांचा सहभाग याबाबत माहिती दिली.

प्रमुख अतिथि राज्यस्तरीय बँकेचे प्रमुख व सरवस्थापक मा.श्री. विजय कांबळे साहेब यांनी जन धन योजनेचे महत्व सांगून सर्व सामान्य जनतेतून अर्थव्यवस्थेला मिळत असलेल्या प्रतिसाद व मुख्यप्रवाहात त्यांचा सहभाग याबाबतीत माहिती देवून सामाजिक योजना अंतर्गत प्रधानमंत्री जन धन योजना , प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधान मंत्री जीवन ज्योति विमा योजना, अटल पेन्शन योजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन करून बँकांनी तळागाळातील सर्व सामान्य जनतेसाठी केलेल्या कामामुळे सर्व सर्व सामान्यांचा जीवनस्तर उंचावण्याचे जे काम केले त्याबाबत कौतुक करून यापुढेही अधीकाधिक कार्यरात राहून कार्य करण्याबाबत मार्गदर्शन केले.

इनकम टॅक्सचे डेप्युटी कमिशनर मा.श्री. संजीव वर्मा यांनी अर्थव्यवस्थेतील बँकानी कोविड कार्यकाळात व विविध योजनामधून सर्व सामान्य जनतेला डिजिटल बँकिंगच्या माध्यमातून देण्यात येत असलेल्या सेवाबाबत उपस्थित बँकर्सचे कौतुक केले.

ऑनलाइन च्या माध्यमातून देशाचे पंतप्रधान मा. श्री नरेंद्रजी मोदी व अर्थमंत्री मा. निर्मला सितारामन यांनी विविध योजनांच्या माध्यमातून सर्व सामान्य घटकांना शेतकरी , कष्टकरी , महिला बचत गट , छोटे कारागीर , यांना अर्थसाहाय्य व अनुदान वाटापातील बँकांच्या सहकार्याबाबत समाधान व्यक्त करून आभार मानले व विविध योजना व त्यांचे फलित तसेच अधिकाच्या नवनवीन योजना कार्यान्वित करताना त्या अधिक सुलभ करून सर्वांसाठी एकच प्रणाली अस्तित्वात आणण्याबाबत सूचित केले. सर्वांसाठी www.jansamarth.in हे पोर्टल माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी सर्वांसाठी आज खुले केले.

जिल्हा अग्रणी बँक मुख्य व्यवस्थापक श्री.श्रीकांत कारेगांवकर यांनी मान्यवरांचे आभार व्यक्त केले त्याबरोबरच उपस्थीत बँकर्स व लाभधारकांनी पुढील कार्यक्रमासाठी अधिकाधिक संख्येने उपस्थित रहावे असे अपील केले .

**निगमित संप्रेषण और निवेशक संबंध**
प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेली -020:25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार

